# निशाणी क्र. ४२ खाली आदेश

विनाकैफियत आदेश रद्द करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जातील संक्षिप्त कथन असे की, प्रतिवादी क्र. २ यांना कायद्याचे ज्ञान नसल्याने व त्या महिला असल्याने तसेच त्यांच्या वकीलांना वेळेत भेटून आवश्यक ती माहिती व कागदपत्रे पुरवू शकले नाहीत. तसेच वादीने आपसांत तडजोड करु असे म्हटले होते. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ ला वेळेत कैफियत दाखल करता आली नाही. सबब कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करावा व कैफियत दाखल करण्यासाठी परवानगी मिळणेबाबत प्रतिवादीने विनंती केली.

३. वादीतर्फे प्रस्तुत अर्जास, अर्जातील कारण संयुक्तीक व कायदेशीर नसुन खोटा आहे. सबब अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी २ यांचे विरुध्द खर्चाचा हुकूम व्हावा अशी विनंती केली. अर्ज व त्यावरील म्हणणे पाहिले. उभयपक्षांचे लेखी म्हणणे विचारात घेतले.

४. निर्णयासाठी निर्माण होणारे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणेः

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होण्यास पात्र आहे काय ? | 'होय' |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

५. प्रतिवादी क्र. २ ही महिला असल्याने व तिला कायद्याचे ज्ञान नसल्याने तसेच वादीने आपसांत तडजोड करुया असे म्हणाल्याने त्यांच्या वकीलांना आवश्यक कागदपत्रे वेळेत पुरवू न शकल्याने कैफियत दाखल करण्यास विलंब झाल्याचे प्रतिवादी

क्र. २ हिचे म्हणणे आहे. सोबत शपथपत्र दिले आहे. सदर प्रतिवादी हिने दिलेले कारण संयुक्तीक नाही. असे असले तरी वरील बाबींना अनुसरुन अर्ज नामंजुर केल्यास प्रतिवादी क्र. २ चे नुकसान होईल. कारण सदर प्रकरण स्थावर मिळकती संदर्भात आहे. सदर दावा हा वाटपाचा व कायम मनाई मिळणेबाबतचा आहे. त्यामुळे दाव्याचे योग्य व परिपुर्ण निर्णयासाठी या प्रतिवादी क्र. २ हिला बाजु मांडण्याची संधी देणे आवश्यक आहे. सबब वरील मुद्दयाचा निष्कर्ष होकारार्थी नोंदवुन पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

## **आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

न्यायालयात घोषीत करण्यात आले.

Digitally signed by Bhausaheb Changdeo More
Date: 2021.02.02 14:05:07 +0530

(भा. चां. मोरे )

दि. ०१.०२.२०२१.

६वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
सोलापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | A.B. Sandrok |
| Court | - | 6th Jt. CJSD & ACJM, Solapur. |
| Date of Judgment/Order | - | 01/02/2021 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 01/02/2021 |
| Judgment/Order uploaded on | - | 02/02/2021 |